# मागेल त्याला काम

## रोजगार हमी योजना
## ग्रामीण गरीबांची अमृतयोजना

लेखक
**संजय सावळे**

प्रकाशक
**वचन संस्था**
नाशिक



कै. वि. स. पागे यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन

लेखक :

**संजय सावळे**

प्रकाशक :

**वचन संस्था**

'वसुंधरा', शिवाजीनगर, डॉ. आंबेडकर नगर जवळ नाशिक – ४२२ ००६

फोन : (०२५३) २४१२५२०.

सहकार्य :

इन्स्टीट्यूट ऑफ डेव्हलपमेंट स्टडीज्

यूनिव्हर्सिटी ऑफ ससेक्स् , ब्रायटन, लंडन.

मुद्रक :

**योरा प्रिंटर्स**

३, प्रियदर्शनी बिल्डींग, उपनगर नाका, नाशिक–पुणे रोड, नाशिकरोड

फोन : ०२५३–२४१९११८, ९४२२२५७२९३.

To Dear Patel Madam,
It is another step towards the destination you showed. Thank you very much
Sanjay
4-4-05

## प्रकाशकाचे मनोगत

त्र्यंबकेश्वर व इगतपूरी तालुक्यातील गरीब आदिवासी शेतकऱ्यांच्याकडे शेतजमीन कमी आहे, डोंगर उताराची जमीन आहे, पावसाच्या पाण्यावर अवलंबून शेती आहे, पारंपारीक पिके घेतली जातात याची उत्पादकता कमी आहे. अती पावसामुळे जमिनीची धूप होण्याचे प्रमाण मोठे आहे आणि शेती व्यतिरिक्त रोजगाराची संधी उपलब्ध नाही. साक्षरतेचे प्रमाण खूप कमी आणि आरोग्याच्या प्राथमिक सोयी सवलतीही पोहचत नाहीत. या परिस्थितीत गेली १५ वर्षे वचन संस्था, श्रमजिवी संघटनेच्या सहाय्याने विविध कार्यक्रमाच्याद्वारे विकासाच्या वाटेवर चालण्याचा प्रयत्न करीत आहे.

याच प्रयत्नात असताना रोजगार हमी योजनेची माहिती श्री. संजय सावळे यांच्याकडून मिळाली व आमचा कामाचा उत्साह आणखी वाढला, कारण या योजनेची व्याप्ती व ताकद खूप मोठी आहे. ज्या माहितीच्या आधारे आम्ही गावातील कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण घेत आहोत, त्याच आधारावर बारा भागांची श्रृतिका तयार करुन आकाशवाणीवर प्रसारित केली. अश्या माहितीच्या प्रसारणामुळे रोहयोचा प्रभावीपणे उपयोग घेऊ शकाल.

या अनुभवावर आधारित या पुस्तिकेचा प्रपंच करावा असे योजिले. श्री. संजय सावळे यांना तर आम्ही आमचे सहकारी कार्यकर्तेच मानतो, त्यांनी वेळोवेळी आम्हाला खूप मदत केलेली आहे व या पुस्तिकेच्या कल्पनेला उत्साहाने मान्यता दिली.

रेडिओ श्रृतिकेच्या दोन सीडींचा संच (सादरकर्ते : माय क्रिएशन्स्, नाशिक) आणि ही पुस्तिका या दोन्हीचा वापर करुन खेडोपाडी रोहयोची माहिती सोप्या पध्दतीने पोहचविता येईल अशी आशा आहे.

**झिंदाबाद !**

**-अश्विनी कुलकर्णी**

मार्च २००५

## लेखकाचे मनोगत व ऋणनिर्देश

रोहयो ओळख करुन देणारी ही पुस्तिका व सी.डी. यांचा संच जाडजूड, मोठ्या पुस्तकापेक्षाही महत्वाचा आहे. याचा तळागाळात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना व ग्रामीण गरीबांना प्रत्यक्ष कामात फायदा होणार आहे. इंग्लंडमधील विकासाचा अभ्यास करणारी संस्था (I.D.S.) आणि पुणे विद्यापिठाच्या समाजशास्त्र विभागाने २००१ मध्ये रोहयोच्या व्यापक संशोधन प्रकल्पावर माझी निवड केली. नाशिक जिल्ह्यातील 'रोहयो' व संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना यांचा तुलनात्मक अभ्यास करताना ३५ गावांमध्ये जाऊन मी सखोल अभ्यास केला. हा अभ्यास करताना जाणवले की रोहयोची माहिती ग्रामीण गरीबांना व पुढारी कार्यकर्ते यांना पुरेशा प्रमाणात नाही. वचन व श्रमजीवी संघटनेच्या मदतीने रोहयोची माहिती तळागाळपर्यंत पोहोचविण्याचे आम्ही ठरविले. प्रशिक्षण शिबीरे,गावातील बैठका यांच्या रुपाने रोहयोचे स्वरुप, तिची ताकद, हक्क यांची माहिती वचनच्या कार्यक्षेत्रात म्हणजे इगतपुरी व त्र्यंबकेश्वरच्या क्षेत्रात बऱ्यापैकी करुन देण्यात आली. रोहयोची माहिती खालपर्यंत पोहोचविण्यात वचनच्या अश्विनी कुलकर्णी, हरीभाऊ अंबापुरे, काशिनाथ वारघडे, भगवान मधे व अन्य अनेक कार्यकर्त्यांनी तळमळीने प्रयत्न केले. याचा चांगला परिणाम २००३-२००४ च्या वर्षात दिसून आला. त्र्यंबकच्या तहसिलदारांचे सहाय्य आणि रोहयोची माहिती यामुळे मागण्या वाढल्या. रोहयोची कामे वाढली. यंत्रांचा, गैरवापराचा प्रभाव कमी झाला. I.D.S. संस्थेचे मीक मूर यांनी रेडिओ कार्यक्रम व पुस्तिकेसाठी सुचविले त्याकामी मदतही केली. सीडी व पुस्तकांचा हा संच त्यातूनच पुढे आला.

खेड्यांच्या प्रत्यक्ष अभ्यासावर आधारित अशा माझ्या तीन-साडेतीन वर्षाच्या रोहयोच्या अभ्यासातून हे पुस्तक आकाराला येत आहे.

माझ्या अभ्यासाला मदत करणारे आय.डी.एस. संस्थेचे डॉ. मीक मूर, डॉ. अनुराधा जोशी तसेच पुणे विद्यापिठातील समाजशास्त्राच्या प्राध्यापिका डॉ. सुजाता पटेल यांचा मी ऋणी आहे.

अश्विनी कुलकर्णी आणि वचन, श्रमजिवी संघटनेचे कर्मचारी, कार्यकर्ते यांनी माझ्या संशोधनाच्या कामात मदत केलीच, पण त्याबरोबर रोहयोचे अभियान प्रत्यक्षात आणण्याचे काम हाती घेतले. रोहयोचा असा प्रभावी वापर करुन विकास साधता येईल असा अभ्यास, विश्वास व वातावरण निर्माण केले. येथे या सर्वांचे ऋण मी मनोमन मानीत आहे.

माझ्या संशोधन प्रकल्पास सहाय्य करणारे माझे संस्थाप्रमुख मा. डॉ. वसंतराव पवार, प्राचार्य व्ही. आर. रसाळ, सामाजिक कार्यकर्ते श्री. मोहन हिराबाई हिरालाल, मोहन गुंजाळ, डॉ. अशोक चौसाळकर, वसंतराव पळसीकर, दत्ता सावळे, मुकूंद दिक्षित, श्रमजीवी संघटनेचे कार्यकर्ते, अरुण ठाकूर, मित्रवर्ग प्रा. शंकर बोराडे, विलास पाटील, प्रा. गणपत लोमटे, विशाल जाधव, श्रृती तांबे, शाजी जोसेफ, अनुरेखा चारी यांची मला खुप मदत झाली. उपजिल्हाधिकारी श्री. गुंजाळ, श्री. प्रल्हाद कचरे, सध्याचे रोहयो प्रमुख उपजिल्हाधिकारी श्री. चिखले तसेच विविध पातळ्यांवरील शासकीय अधिकारी, नेते, ग्रामस्थांनी मला मदत केली. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. माझ्या प्रेरणास्थानी असलेले डॉ. द. ना. धनागरे. महाराष्ट्राची रोहयो आणि केंद्राची संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना यांच्या तुलनात्मक अभ्यासावर माझ्या पी.एच.डी. साठी मला मार्गदर्शन करणाणे डॉ. सर्जेराव साळुंखे यांचेही ऋण मी व्यक्त करतो.

**-संजय सावळे**

# रोजगार हमी योजना : ग्रामीण गरीबांची अमृत योजना

*प्रस्तावना :*

खेड्यापाड्यावरच्या कष्टकरी भावा बहिणींनो !

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून बरीच वर्षे झाली. या काळात जग खूप बदलले. शहरांचा, उद्योगधंद्यांचा विकास झाला, पण खेडी फारशी सुधारली नाही. खेड्यात रहाणाऱ्या बहुसंख्य गरीबांचे जीवन फारसे बदलले नाही. कागदावर गरीबीचे प्रमाण कमी झाले पण आभाळावर भिस्त असलेली शेती, लहरी हवामान, लहान जमिनीचे तुकडे, जमीन नसणाऱ्यांचे मोठे प्रमाण, उद्योग व व्यवसाय तसेच नोकऱ्यांचा अभाव यासारख्या अनेक कारणांमुळे खेड्यातील लहान शेतकरी, शेतमजूर यांची गरीबी तशीच राहिली. काही ठिकाणी ती वाढली आहे. वर्षातून ४-६ महिने काम नाही अशी परिस्थिती प्रत्येकवेळी आढळते. दुष्काळ पडला किंवा टंचाईची परिस्थिती आली तर बेकारी आणखी वाढते आणि हातातोंडाची गाठ पडणे अवघड जाते. शहरात जाऊन मोलमजुरी करुन कसेबसे पोट भरणे किंवा सरकारच्या नावानं बोटं मोडत घरीच अर्धपोटी रिकामं बसणं आपल्या नशिबी येतं. अशावेळी महाराष्ट्र सरकारची रोजगार हमी योजना (रो.ह.यो.) गरीबी व बेकारीवर मात करुन स्वत:चा व खेड्याचा विकास साधण्याचा एक चांगला मार्ग ठरतो. रोजगार हमी योजनेची, त्यातील गरीबांच्या हक्कांची-अधिकारांची माहिती करुन देण्याच्या उद्देशाने ही पुस्तिका लिहून आपल्यापर्यंत पोहोचत आहे. रोहयोच्या दारिद्रय निर्मूलन, व्यक्ती व ग्रामविकासाच्या ताकतीची कल्पना यावी, तिचा वापर करुन खेड्यातील गरीबांनी आपला व गावाचा विकास कसा साधावा याबाबतची माहिती या पुस्तकात दिली आहे.

## रोहयो म्हणजे काय ?

रोजगार हमी योजना (म्हणजेच रो.ह.यो.) ही ग्रामीण भागातील गरीबी हटविणारी महाराष्ट्र सरकारची योजना आहे. खेड्यातील श्रमाची कामे करणारे गरीब, मजूर, भुमिहीन व लहान शेतकरी आणि दुष्काळ किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणाने बेकार असलेल्या सर्वांसाठी ही योजना राबविली जात आहे. खेड्यातील बेकार, गरीबांना काम/रोजगार पुरवून त्यातून कुटुंबांचा, गावाचा व ग्रामीण भागांचा सगळ्या बाजूंनी विकास व्हावा, तसेच गरीबांना आधार देऊन त्यांची ताकद वाढावी अशी रोहयोची मांडणी आहे. त्यांच्या श्रमातून ग्रामीण भागातील उत्पादन साधनांची उत्पादकता वाढवून ग्रामीण मजुरांना बेकार राहावे लागणार नाही असेही आश्वासन या योजनेत आहे.

## रोहयो कधी सुरु झाली ?

जुने स्वातंत्र्य लढ्याचे नेते कै. वि. स. पागे यांच्या विशेष प्रयत्नातून रोहयो जन्माला आली. पागे यांनी अनेक वर्षे अभ्यास करुन खेड्यातील गरीबांना कामाचा/रोजगाराचा हक्क व संरक्षण देण्याच्या हेतुने आणि गरीबांच्या श्रमातूनच गावाचा विकास साधण्यासाठी रोहयोचा आराखडा तयार केला. तसेच १९७२ च्या महाराष्ट्रातील तीव्र दुष्काळाच्या परिस्थितीत रोहयोचा आराखडा त्यावेळचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक व अन्य राजकीय नेत्यांनी स्विकारला. रोहयो १९७४ पासून एक सर्व महाराष्ट्रभर राबविली जाणारी योजना म्हणून काम करु लागली. १९७७ मध्ये रोजगार हमी कायदा केला आणि त्यामुळे महाराष्ट्रातील गरीबांना काम मागण्याचा कायदेशीर अधिकार मिळाला.

## रोहयो आज का गरजेची / महत्वाची आहे ?

रोहयो ही जुनी टाकावू योजना आहे. आज ती महत्वाची नाही म्हणून ती बंद करावी असे काही लोक म्हणतात. त्याचं म्हणणं हे की, आता दारिद्रय खूप कमी झाले. म्हणून रोहयोची गरज नाही. ते म्हणतात रोहयोत भ्रष्टाचार खूप आहे म्हणून ती गरीबांना फायद्याची नाही. पण हे खरे नाही. रोहयो आजही गरजेची व महत्वाची आहे. देशाला, ग्रामीण लोकांना विशेषत: ग्रामीण गरीबांना अत्यंत उपयुक्त, फायदेशीर आहे ! अलिकडच्या काळात उलट रोहयोचे महत्व वाढले आहे.

ग्रामीण भागात दारिद्रय रेषेखालील लोकांचे प्रमाण घटले आहे हे काहीसे

खरे आहे. पण तेवढ्याने खेड्याचा विकास झाला असे दिसत नाही. दारिद्रय हटले असेही दिसत नाही. रोजगार, शिक्षण, शेती, आरोग्य, पाणी या बाबतची खेड्यांची परिस्थिती समाधानकारक नाही. वर्षातून ४/५ महिने तीव्र बेकारीत मजुरांना काढावी लागत आहेत. जगण्यासाठी स्थलांतर करावे लागत आहे. मजुरांना वेठ बिगारीसारखे जिणे येथे जगावे लागत आहे. उपासमार, खेड्यातील गरीबांच्या मुलांच्या शिक्षणाचा खेळखंडोबा आज सुरु आहे. उसनवारी, कर्ज काढून जगावे लागते. त्या पोटी अल्प मजुरीवर त्यांना राबावे लागते. म्हणूनच रोजगाराची हमी देणारी ही योजना, मागेल त्याला काम देणारे तिचे आश्वासन आज उपयुक्त आहे. रोहयो काम पुरवण्याचे आश्वासन तर देतेच, पण गावाच्या विकासाची साधनेही त्या कामातून निर्माण होत आहेत. तळी, बंधारे, रस्ते, जंगलाचे संवर्धन यांचा विकास या मजुरांच्या श्रमामुळे शक्य होणार आहे ! पाणी, जंगल, जमिनीची धूपणी थांबवणे यामुळे ग्रामिण विकास व शेतीची उत्पादकता वाढणार आहे. गावाची अर्थव्यवस्था त्यामुळे सुध्दा होणार आहे.

प्रजासत्ताक कोरिया, काही आफ्रिकन देशांनी महाराष्ट्राच्या रोहयोचा अभ्यास करुन आपापल्या देशात रोजगाराच्या योजना आखल्या. जगभर नावाजलेली महाराष्ट्राची रोहयो आता केंद्र शासनाने स्विकारली असून आता ती भारतभर राबविली जाणार आहे. ह्या सर्व रोहयोच्या गोष्टी महत्वाच्या आहेत.

**रोहयोची ठळक वैशिष्ट्ये कोणती ?**

*रोहयोची मुख्य/ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.*

**१) मागेल त्याला काम :** रोहयोचे काम १८ वर्षे वय पूर्ण केलेल्या खेड्यातील तसेच क दर्जाच्या नगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही स्त्री-पुरुषाला मिळू शकते. गरीबी, दुष्काळ, शेतीचे किंवा दुसरे काम मिळत नाही अशावेळी खेड्यातील कोणीही कामाची मागणी करुन काम मिळवू शकतो. एखाद्या कुटुंबात कुणीच कमावणारे नसेल तर १५ ते १८ वर्षातील मुला-मुलींना देखील रोहयोचे काम मिळू शकते.

**२) कामाची हमी :** रोहयोचे काम मागितल्यावर ते खात्रीने मिळणार अशी हमी महाराष्ट्राच्या सरकारने दिली आहे. काम मागणाऱ्या ग्रामीण मजूरांची संख्या मोठी असली तरी खात्रीने ५०/६० दिवस काम मिळेल अशी व्यवस्था महाराष्ट्र सरकारने केली आहे. दुष्काळ असेल किंवा मोठी गरज असेल तर आणखीही

काम पुरेशा रोहयोच्या मागण्या करुन मिळवता येते.

**३) काम मिळविण्याचा कायदेशीर अधिकार :** रोहयोचे काम खेड्यातील प्रत्येक गरजूने मागणे आणि ते गरज असेल तेव्हा कधीही मिळवणे हा महाराष्ट्रातील प्रत्येक खेडूताला मिळालेला कायदेशीर हक्क आहे. जगात अन्यत्र कुठेही अस्तित्वात नसणारा हा कायदा महाराष्ट्र रोजगार हमी योजना, अधिनियम या नावाने महाराष्ट्र शासनाने १९७७ ला मंजूर केला आणि २६ जानेवारी १९७९ रोजी तो राज्यभर लागू झाला. मजूराने मागणी केल्यावर १५ दिवसांत शक्यतो त्याच्या राहत्या घरापासून जवळ काम देण्याची हमी शासनाने दिली आहे. जर असे काम उपलब्ध नसेल तर ते तालुका पातळीवर आणि अगदीच अशक्य असल्यास जिल्हा पातळीवर कुठेही पुरविण्याची व्यवस्था सरकार करेल. मात्र अशा वेळी कामावर जाण्याची, परतण्याची व कामाच्या ठिकाणची रहाण्याची व्यवस्था सरकार करते. मागणी करुन १५ दिवसांच्या आत कुठेही काम सरकारने दिले नाही तर आपल्याला सरकार विरुध्द तक्रार करुन बेकार भत्ता (रोज दोन रुपये असा) मागण्याचा हक्क देखील कायद्याने दिला आहे.

**४) कष्टाचे (श्रमप्रधान) काम :** रोहयोचे काम हे शारिरीक कष्टाचे, श्रमाचे काम आहे. गरीबांना काम मागणाऱ्या प्रत्येक खेडूताला रोजगार पुरविण्यासाठीच रोहयो तयार झाली आहे. खेड्यातील मुबलक श्रमशक्तीचा विकासासाठी वापर हे रोहयोचे उद्दिष्ट आहे.

**५) उत्पादक काम :** रोहयोचे काम हे केवळ उत्पादक स्वरुपाचे असते. कामातून दुसरे काम निर्माण व्हावे असा त्याचा उद्देश आहे. समजा रोहयोतून गावतळ्याचे काम झाले तर त्यामुळे पाणी गावतळ्यात साठेल. त्याचा शेतीला उपयोग होईल यामुळे शेतीतील रोजगारात/कामात वाढ होईल. मासेमारींची नवी सोय उपलब्ध होईल.

**६) खेड्याच्या मालकीची साधने निर्माण करणारे काम :** रस्ते, विहीरी, गांवतळी, पाझरतलाव, पाटबंधारे, वनतळी ही सर्व गावाची संसाधने आहेत. या संसाधनांमुळे गावाची प्रगती होते. अशी संसाधने निर्माण करणारे काम रोहयोतून घेतले जाते.

**७) दुष्काल हटविणारे काम :** दुष्काळाची झळ पोहोचू नये अशी कामे रोहयोतून करणे महत्वाचे मानले जाते. तलाव, पाझरतलाव, गावतळी, वनतळी, बंधारे ही

जलसंधारणाची व मृदसंधारणाची कामे जमिनीवरील व जमिनीखालील पाण्याची पातळी वाढविणारी असल्याने त्यातून दुष्काळ हटविणे, पाणी टंचाई कमी करणे शक्य होते. जंगलाच्या संवर्धनानेही हे काम शक्य आहे.

**८) खेड्याचा विकास घडविणारे काम :** रोहयो केवळ गरीबांचीच योजना नाही. दुष्काळ हटविणारे, खेड्याच्या मालकीची साधने निर्माण करणारे तसेच उत्पादक काम हाती घेऊन रोहयो खेड्याचा संपूर्ण विकास साधू शकते. अशा कामातून मजूरांना मजूरी मिळतेच पण जमिनीची धूप रोखणे, पाण्याचा साठा वाढविणे, अंतर्गत व बाह्य रस्त्यांची बांधणी करुन शहराशी संपर्क व व्यापार वाढविणे, शेतीचा विकास साधणेही शक्य होते.

**९) गावातच काम :** रोहयोची कामे मागितल्यावर शक्यतो मागणी करणाऱ्याच्या गावात किंवा गावाजवळच काढली जातात. त्यामुळे कामाची टंचाई असेल तेव्हा खेडूतांना शहरात जावे लागत नाही. शहरात जाणे टाळले गेल्यामुळे भाडेखर्च वाचतो, स्त्रियांनाही सहजपणे कामाला जाता येते. शहरातील रहाण्या-जेवणाचा खर्च वाचविणे शक्य होते, मुलांच्या शाळा बुडत नाहीत.

## रोहयोचा जन्म आणि विकास कसा झाला ?

जेव्हा विशिष्ठ लाभासाठी गरीब आणि श्रीमंत स्पर्धा करीत असतात तेव्हा ते लाभ श्रीमंताकडे जाण्याची शक्यता जास्त असते. खेड्यातील काबाडकष्ट करणाऱ्या गरीबाला केंद्रबिंदू मानून त्याला रोजगार, रोजीरोटी, आपत्ती काळात संरक्षण आणि विकासाची संधी देण्याच्या हेतूने कै. वि. स. पागे यांनी अनेक वर्षे अभ्यास करुन रोहयोचा आराखडा बनवला. १९७२ च्या दुष्काळात रोहयो महाराष्ट्रात सर्वप्रथम राबवली गेली आणि १९७४ नंतर रोहयो एक स्थिर, सर्व महाराष्ट्रभर राबविली जाणारी योजना म्हणून स्विकारली गेली.

रोहयोची यंत्रणा, कामाचे स्वरुप, कामाचे नियम यामध्ये बदल झाले आणि रोहयोचा विस्तारही वाढला. रोहयो ही केवळ गरीबांची योजना न रहाता ती ग्रामविकासाची योजना बनली. १९७९ मध्ये रोहयोचा कायदा लागू झाला. १९७९ मध्ये श्रमशक्तीद्वारे ग्रामविकास हा रोहयो अन्तर्गत नवा कार्यक्रम राबविण्यात आला. त्याद्वारे रोहयोच्या अंमलबजावणीतील गावकऱ्यांचे अधिकार व सहभाग वाढविण्यात आला. गाव हा विकासाचा घटक मानून स्वतःहून पुढे येणाऱ्या गावांना प्राधान्य देण्यात आले.

१९९० नंतर फळझाडे लागवड (फळबाग विकास) कार्यक्रम राबविला जात आहे. तुती व रेशम पैदास, खादी विकास असेही कार्यक्रम रोहयोत सामिल करुन ग्रामीण भागात स्वयंरोजगार, लघुउद्योग यांनाही चालना देण्यात येत आहे. शेती, फळझाडे यासाठी सिंचनाचा विकास व्हावा या हेतूने शेतजमिनींचे सपाटीकरण, १९८८ पासून जवाहर विहीर योजनेमार्फत खाजगी जमिनीमध्ये मोफत विहीरी बांधून देण्याचे कार्यक्रम रोहयोमध्ये सामील झाले. आज रोहयो तीस वर्षापेक्षाही अधिक काळ महाराष्ट्रात ३५ पैकी ३३ जिल्ह्यात यशस्वीपणे राबविली जात आहे.

## रोहयोला पैसा कोण पुरवतो ?

रोहयो ही श्रीमंतांच्या पैशातून गरीबांसाठी राबविली जाणारी योजना आहे. नोकरदारांचा व्यवसाय कर, मोठे शेतकरी,व्यापारी यांच्यावरील कर व त्यामध्ये सरकारी पैशाची भर घालून रोहयो साठीचा फंड (पैसा) उभा केला जातो. दरवर्षी जवळपास १२०० ते १५०० कोटी रु. रोहयो फंडात जमा होतात. हे पैसे केवळ रोहयो साठीच वापरायचे असे बंधन सरकारवर आहे. रोहयो फंडातील पैसा सरकारला इतर गोष्टींवर खर्च करता येत नाही. रोहयोचे काम त्या प्रमाणात निघाले नाही तरी त्या वर्षीचा रोहयोचा फंड पुढील वर्षी वापरावा लागतो. त्या त्या वर्षीचा फंड सरकारने रोहयोत वापरला नाही म्हणून कोट्यावधी रुपयाचा रोहयो फंड सरकारकडे शिल्लक आहे.

## रोहयो कोण चालवतात ? रोहयोची कार्ययंत्रणा कशी आहे ?

रोहयोच्या प्रशासकीय खर्चात काटकसर करण्यासाठी व तिचा लाभ अधिकाधिक मजूरांपर्यंत पोहोचविण्यासाठी रोहयोची स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणा निर्माण केली नाही. त्या यंत्रणांना विभागांना व अधिकाऱ्यांनाच रोहयोचे काम अतिरिक्त काम म्हणून दिले आहे. रोहयो चांगल्या प्रकारे राबविण्यासाठी रोहयोची विविध पातळ्यांवरील यंत्रणा निर्माण केली आहे. ती पुढीलप्रमाणे :-

| पातळी | अधिकारी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|
| राज्य पातळीवर | १) रोहयो मंत्री<br>२) राज्यस्तरीय नियोजन-विभाग | रोहयोचा सर्वोच्च अधिकारी<br>कार्यक्रमाची आखणी, नियोजन, प्रशासन, निधींची तरतूद इ. कार्ये |

| | | |
|---|---|---|
| विभाग पातळीवर | १) महसूल विभागाचे आयुक्त<br>२) रोहयो उपायुक्त | आपल्या ४,५ जिल्ह्यांच्या विभागातील रोहयो कामांचे नियोजन करणे, निधी पुरवणे. |
| जिल्हा पातळीवर | १) जिल्हाधिकारी<br>२) उपजिल्हाधिकारी, रोहयो | आपल्या जिल्ह्यातील रोहयो कामांची आखणी, नियोजन. |
| तालुका पातळीवर | १) तहसिलदार आणि रोहयो ऑफिस | आपल्या तालुक्यातील रोहयो कामांची नीलप्रत बनविणे, मागण्या संकलीत करुन जिल्हाधिकाऱ्यां कडे पाठविणे. कामांना आदेश मिळविणे व यंत्रणा/विभागांना कार्यारंभ आदेश देणे-कामाचा समन्वय साधणे. |
| गांव पातळीवर | १) तलाठी | गावातील मागणीप्रमाणे मजूरांची नोंद करणे, त्यांना ओळखपत्र देणे, रोहयोच्या मागण्या गोळा करणे, त्या तहसिल ऑफिसकडे पोहोचविणे. |

गावकऱ्यांनी मजूरांनी रोहयोच्या कामाची मागणी केल्यावर तलाठी त्यांच्या क्षेत्रातील गावांचे सर्व मागणी अर्ज एकत्र करुन तहसिलदारांकडे पाठवतात. तहसिलदार या मागण्यांचा व दुष्काळ, टंचाई स्थितीचा अंदाज घेऊन या मागण्यांचे प्रस्ताव पंचायत समितीच्या मदतीने कलेक्टर कचेरीत पाठवितात. तेथून मंजूरी मिळाल्यावर तहसिलदार लघुपाटबंधारे, कृषि, वन, सार्वजनिक बांधकाम अशा विभागाच्या अधिकाऱ्यांना (रावसाहेबांना) कार्यारंभ आदेश देतात. हे अधिकारी आपल्या हजेरी सहाय्यकांच्या (तात्या) मदतीने मागणी केलेल्या गावाच्या आसपास तेथील परिस्थितीचा अंदाज घेऊन व अभ्यास करुन काम सुरु करतात. काम सुरु होण्याआधी ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, ग्रामसेवक यांच्याशी चर्चा होते. गावकऱ्यांना काम सुरु होणार याची माहिती दवंडीद्वारे अथवा ग्रामपंचायतीच्या फलकावर सूचना लिहून केली जाते.

**रोहयोची मूल्यमापन व मार्गदर्शन यंत्रणा कोणती ? ती कशी काम करते ?**

रोहयोचे कामकाज सुरळीतपणे चालू आहे की नाही, रोहयोच्या कामाचे लाभ गरीबांपर्यंत जातात की नाही, रोहयोचा परिणाम कसा आहे हे अभ्यासणे. रोहयो अधिक चांगल्या रितीने काम करावी या हेतूने अभ्यासावर आधारित मार्गदर्शन व सूचना करणे यासाठी चार पातळ्यांवरील रोजगार हमी योजना समित्या तयार केल्या आहेत.

अ) राज्य स्तरावर विधानसभा व विधान परिषद सदस्यांची रोहयो समिती :-

ब) जिल्हा स्तरावरील रोहयो समिती :-

क) पंचायत समिती स्तरावरील रोहयो समिती :-

ड) ग्राम पातळीवरील रोहयो समिती :-

**अ) राज्य स्तरावर रोहयो समिती :-**

विधानसभा अध्यक्षांनी निवडलेले विधानसभेचे ११ सदस्य आणि विधानपरिषदेच्या सभापतींनी निवडलेले काही सदस्य (सामान्यपणे ४) यांची राज्य स्तरावरील रोहयो समिती तयार होते. आमदारांच्या या समितीचेच एक सदस्य तिचे प्रमुख म्हणून काम पहातात. या समितीचे सदस्य आपापल्या नेमून दिलेल्या क्षेत्रातील रोहयोच्या कामांची पाहणी, मूल्यमापन करुन अड़चणी सोडविणारे व सुधारणा करणारे उपाय सुचवितात.

**ब) जिल्हा स्तरावरील रोहयो समिती :-**

जिल्ह्याच्या पातळीवर काम करणाऱ्या या समितीचे सदस्य पुढीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| १) पालकमंत्री.... | अध्यक्ष |
| २) जिल्ह्यातील मंत्री/राज्य मंत्री.... | सह अध्यक्ष |
| ३) एक खासदार.... | सदस्य |
| ४) तीन आमदार.... | सदस्य |
| ५) जि.प.अध्यक्ष.... | सदस्य |
| ६) जि.प. बांधकाम समिती अध्यक्ष.... | सदस्य |
| ७) मागासवर्गीय वर्गीय समाजाचे दोन सदस्य.... | सदस्य |
| ८) अ शासकीय दोन.... | सदस्य |
| ९) मजूर प्रतिनिधी/शेतमजूर संघाचे दोन प्रतिनिधी.... | सदस्य |
| १०) महिला सदस्य दोन प्रतिनिधी.... | सदस्य |

११) मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प..... सदस्य

१२) जिल्हाधिकारी.... सदस्य सचिव

**क) पंचायत समिती स्तरावरील रोहयो समिती :-**

तालुका पातळीवर काम करणाऱ्या ह्या समितीचे सदस्य पुढीलप्रमाणे-

१) पंचायत समिती क्षेत्रातील आमदार अध्यक्ष

२) पंचायत समिती क्षेत्रातील विधान परिषद सदस्य सदस्य

३) पं.स.सभापती सदस्य

४) मागासवर्गीय समुहाचे दोन सदस्य सदस्य

५) अशासकीय असे दोन सदस्य सदस्य

६) रोहयोचे मजूर अथवा शेतमजूर संघाचे दोन प्रतिनिधी सदस्य

७) एक महिला प्रतिनिधी सदस्य

८) प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास गट) सदस्य

९) गट विकास अधिकारी सदस्य

१०) तालुक्याचे तहसिलदार (समिती अधिकारी) सदस्य सचिव

ही समिती आपल्या पं.सं. क्षेत्रातील मजूरांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कामाचे नियोजन करणे, मजूरांना मजूरी व सोईसवलती मिळतात की नाही याची पहाणी करणे व आवश्यक त्या सूचना, उपाय जिल्हा रोहयो समितीकडे देणे ही कामे करते.

**ड) स्थानिक पातळीवरील रोहयो समिती :-**

देखरेख व कामावरील गैरप्रकारास, फसवणूकीस आळा घालण्यासाठी गाव अथवा कामाच्या ठिकाणची रोहयो समिती नेमली जाते. ज्या कामावर १०० पेक्षाही अधिक मजूर काम करतात तेथेच ही समिती काम करणाऱ्या शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांकडून जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वानुमतीने तयार केली जाते. सरपंच, पोलिसपाटील, प्राचार्य, शिक्षक यापैकी दोन व्यक्ती सदस्य असतात.

**निरीक्षण आणि दक्षता पथके :**

वरील समित्यांबरोबर आयुक्त, जि.प.चे विशेष कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी (रोहयो) व तहसिलदार यांची निरीक्षण दक्षता पथके काम करीत असतात. रोहयोचे कामकाज नेमून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार, मापदंडानुसार चालते किंवा नाही हे तपासण्यासाठी ते रोहयोच्या विविध कामांना

भेटी देत असतात. अडीअडचणी समजावून घेणे, त्या दूर करणे, गैरप्रकारांना आळा घालणे ही त्यांची मुख्य कामे असतात.

## रोहयोचे कामकाज कसे चालते ?

रोहयोच्या मागणीबरोबर रोहयोच्या कामकाजाचे चक्र सुरु होते व रोहयोचे काम पूर्ण झाल्यावर तसेच लोकांना धान्य, मजूरी मिळाल्यावर ते चक्र थांबते. रोहयोच्या कामकाजाचे हे संपूर्ण चक्र समजावून घेऊ.

## रोहयोसाठी नोंदणी कशी करायची ?

गावातील सर्व गरीबांनी, बेरोजगारांनी व ज्यांना रोहयोच्या कामाची गरज वाटते अशा सर्वांनी गावच्या तलाठ्यांकडे रोहयोसाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. या नोंदणीमुळे काम मागणे आपल्याला सोपे जाते. रोहयोच्या विविध अर्जांमध्ये नोंदणीचाही अर्ज आहे तो खालीलप्रमाणे :-

**नमुना क्र.-१ (नियम ५)**

रोजगार हमी योजनेखाली नोंदणी करावयाच्या अर्जाचा नमुना :

प्रति,

नोंदणी अधिकारी (तलाठी)

गाव :.....

तालुका :......

महोदय,

रो.ह.यो.खाली रोजगार मागणारा म्हणून माझ्या नावाची नोंदणी करावी अशी मी आपणास विनंती करतो/करते. माझ्या संबंधीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

१) नांव :...

२) पत्ता :.....

३) अनुसूचित जाती/जमाती/भटक्या जमातीपैकी असल्याम जाती/जमातीचे नांव :.......

४) पुरुष/स्त्री :......

५) वय :.......

६) जमीन धारणा/मालकी किती हेक्टर :......

आपला/आपली विश्वासू

दिनांक :....

ठिकाण :.... अर्जदाराची सही अथवा अंगठा

हा अर्ज तलाठी यांच्याकडे दिल्यावर ते आपली नोंदणी करुन घेतात व आपल्याला रोहयोचे ओळखपत्र देतात. हे ओळखपत्र दाखविल्यास रोहयोचे काम सहजपणे मिळते. आपण गरजू आहोत याचीही नोंद होते.

रोहयोच्या कामाची मागणी कशी करावी ?

रोहयोचे काम मागणीवर आधारलेले आहे. तुम्ही मागणी केली तरच ते मिळेल.

**मागणी कोण करु शकतो ?**

ग्रामीण भागात रहाणारा १८ वर्षापुढील कोणताही स्त्री-पुरुष रोहयोच्या कामाची मागणी करु शकतो. रोहयोचे काम हे अंगमेहनतीचे, श्रमाचे असते त्यामुळे श्रम करण्याची तयारीही आवश्यक आहे. अशी मागणी एखाद्या व्यक्तीला स्वत:ला किंवा गटाला करता येते.

**मागणी कुणाकडे करायची ?**

रोहयोच्या कामाची मागणी गावचा तलाठी किंवा ग्रामसेवक म्हणजेच नोंदणी अधिकारी यांच्याकडे किंवा तहसिलदार यांच्या ऑफिसमध्ये करु शकतो.

**मागणी कधी करायची ?**

रोहयो ही दुष्काळी योजना नाही. ती बारामाही योजना आहे. म्हणूनच रोहयोची मागणी कधीही करता येते. पण जेव्हा कामाची गरज पडेल, काम मिळणार नाही अशी स्थिती येते त्याच्या महिनाभर आधीच मागणी केलेली चांगली.

**मागणी कशी करायची ?**

रोहयोच्या कामाची मागणी करण्यासाठी नमुना क्र. ४ चा अर्ज दिला जातो. त्याचे स्वरुप साधारणपणे खालीलप्रमाणे असते.

## नमुना क्र. ४ (नियम ६)

रोहयो खाली रोजगार मागणीचे पत्र

प्रति,

समिती अधिकारी,

तालुका :......

नोंदणी प्राधिकारी

गांव :.................तालुका :..........

महोदय,

रोजगार हमी योजनेखाली मला रोजगार पुरविण्याची मी आपणास विनंती करतो. माझ्या संबंधीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

१) नांव :...

२) पुरुष/स्त्री :......

३) नोंदणी क्रमांक :....

२) पत्ता :.....

मी..............याद्वारे हमी देतो की, समिती अधिकाऱ्याने निर्देशित केलेल्या कामावर मी किमान ३० दिवस काम करेन.

आपला/आपली विश्वासू

दिनांक :....

ठिकाण :.... अर्जदाराची सही अथवा अंगठा

वरील अर्ज मिळाला नाही तरी साध्या कागदावरसुध्दा रोहयोचा वरीलप्रमाणे अर्ज लिहून खाली एका किंवा अनेकांच्या सह्या/अंगठे करुन एकत्रितपणे मागणी करता येते. प्रत्येक मागणीचे अर्ज दोन प्रतीमध्ये करावे. नोंदणी अधिकाऱ्याला एक प्रत देऊन दुसऱ्या प्रतीवर नोंदणी अधिकाऱ्याची तारीख टाकून स्वाक्षरी (पोहोच) घ्यावी. यामुळे मागणीचा पाठपुरावा करणे शक्य होईल.

**मागणी केल्यावर काम कधी मिळते ?**

कामाची मागणी केल्यावर रोहयोचे काम १५ दिवसाच्या आत मिळते. रोहयो कायद्यानुसार सरकार १५ दिवसाच्या आत काम देण्यास बांधील आहे. जर

सरकार असे काम गावाजवळ, तालुक्यात किंवा जास्तीत जास्त जिल्ह्यात देऊ शकले नाही तर मागणी करणाऱ्या प्रत्येकाला दर दिवशी रुपये १० इतका बेरोजगार भत्ता मिळू शकतो. असा बेरोजगार भत्ता देणे सरकारला बंधनकारक आहे. कारण रोहयोच्या कायद्याने शासनाने रोजगार पुरविण्याची हमी दिलेली आहे. ही हमी मोडल्याची शिक्षा म्हणून सरकारला बेकार भत्ता देणे आवश्यक आहे. बेकार भत्त्यासाठी नोंदणी अधिकाऱ्याकडे वेगळा अर्ज करुन माहिती देणे आवश्यक असते.

**रोहयोच्या कामाचे स्वरुप कसे असते ?**

रोहयोचे काम कोणते असावे हे ठरविण्याचा अधिकार मागणी करणाऱ्याला नसतो. तरीही गावाच्या गरजांप्रमाणे ग्रामसभेत चर्चा करुन रस्ता, बंधारा, गावतळे यासारख्या कामाची मागणी आपल्याला करता येते. रोहयोमध्ये सामान्यपणे अंगमेहनतीची, खेडेगावात सामुहिक मालमत्ता/संसाधने विकसित करुन विकासाला चालना देणारी अशी कामे काढली जातात. उदा.

१) जलसंधारण व मृद संधारणाची कामे-

(बंधारे, नाला, बांध, दगडी बांध, पाझर तलाव, कंटुर बंडींग, गावतळे, शेततळे, लघुपाटबंधारे, भुविकासाची कामे, खारजमिनीचा विकास, पूर नियंत्रण इ.)

२) वनीकरण व सामाजिक वनीकरण-

३) गावातील अंतर्गत रस्ते-

४) इतर फळबाग विकास, जवाहर विहिरी इ.-

रोहयो अंतर्गत जी कामे घेतली जातात त्यावरील कमीत कमी ५१% रक्कम ही मजूरांच्या अकुशल मजुरीवर खर्च केली पाहिजे. तर जास्तीत जास्त ४९% रक्कम ही कुशल कामगारांची मजूरी, यंत्र, साधने, कच्चा माल यावर खर्च करण्याची मर्यादा घातली आहे.

**रोहयोच्या मागणीला मंजूरी मिळून काम कसे सुरु होते ?**

रोहयोच्या सर्व मागण्यांचे अर्ज नोंदणी अधिकारी म्हणजेच तलाठी, ग्रामसेवक एकत्र करुन तालुक्याच्या तहसिल ऑफिसमध्ये पोहोचवतात.

जिल्ह्यातील विविध विभागांमधील पाऊसपाणी, टंचाईचा व मागण्यांचा विचार करुन दरवर्षी १ ऑक्टोबर ते पुढील ३० सप्टेंबर या वर्षासाठी रोहयोच्या कामांची निवड करुन नियोजन आराखडा तयार केला जातो. हा

आराखडा म्हणजेच नीलप्रत जिल्हा पातळीवरील जिल्हाधिकारी रोहयो यंत्रणेच्या सहाय्याने करतात. या नीलप्रतीत चालू योजनांव्यतिरिक्त इतर मंजूर कामे/ योजनाही तयार ठेवण्यात येतात. त्यामुळे तालुका पातळीवरुन जिल्हाधिकारी कार्यालयात आलेल्या सर्व मागण्यांचा विचार करुन त्या मंजूर करणे सोपे जाते. पाटबंधारे, लघु पाटबंदारे, कृषि, वनखाते, सामाजिक वनीकरण, सार्वजनिक बांधकाम, इमारत व दळणवळण इ. विविध यंत्रणांच्या अधिकाऱ्यांकडून मागणी केलेल्या गावात जाऊन कामाचे स्वरुप व तांत्रिक बाबींचा अभ्यास केला जातो. त्यांची तांत्रिक मान्यता व जिल्हाधिकारी कार्यालयाची प्रशासकीय मान्यता मिळाल्यावर तहसिलदार मागणी केलेल्या गावात काम सुरु करण्याचा आदेश (कार्यारंभ आदेश) संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांना देतात.

**प्रत्यक्ष रोहयोचे काम कसे सुरु होते ?**

तालुक्याच्या तहसिलदारांकडून लघु पाटबंधारे, कृषि यासारख्या यंत्रणांना कार्यारंभ आदेश मिळाल्यावर या यंत्रणांचे अधिकारी (रावसाहेब) त्या गावात जाऊन सरपंच व अन्य प्रतिष्ठितांना या कामाची माहिती देतात. यावेळी शक्यतो गावसभा घेऊन, दवंडीद्वारे अथवा ग्राम पंचायतीच्या बोर्डवर लिहून गावात विशिष्ठ ठिकाणी रोहयोचे काम सुरु होणार आहे. तेथे सर्व काम मागणाऱ्यांनी उपस्थित रहावे अशा सूचना दिल्या जातात. मागणी केल्याप्रमाणे पुरेशा प्रमाणात रोहयोचे काम मागणारे मजूर उपस्थित झाल्यावर आवश्यक त्या सूचना व माहिती देऊन काम सुरु करण्यात येते. काम सुरु झाल्यावर रोहयोवर काम मागणारे व काम करायची इच्छा असलेले, ओळखपत्र असलेले व नसलेले सर्वांना काम मिळू शकते.

**मजूरांचे गट कसे तयार करायचे ?**

रोहयोचे काम रोजंदारीचे नसते, ते अंगावरचे काम असते. म्हणजे जेव्हढे काम करु त्या प्रमाणात मजूरी मिळते. अंगावरचे काम असल्यामुळे ते मजुरांच्या गटाला दिले जाते. मजूरांच्या या गटांची (गँगची) कमीत कमी संख्या ५ व जास्तीतजास्त १२ असावी असे १९८१च्या शासकीय आदेशात लिहिले आहे. हे गट एकाच गावातल्या लोकांचे किंवा शेजारी रहाणाऱ्या लोकांचे असतील तर त्यांच्यात चांगले सहकार्य निर्माण होऊ शकते.

**रोहयोमध्ये केलेल्या कामाची मजूरी कशी, कधी मिळते ?**

- रोहयोची कामे बहुतेकवेळा गटागटाने (गँगने) केली जातात. जेव्हढे काम केले असेल आणि ज्या गुणवत्तेचे काम केले असेल त्याप्रमाणे मजूरी किंवा मोबदला मिळतो.
- रोहयोची मजूरी स्त्री व पुरुषांना सारखीच दिली जाते.
- रोहयोची मजूरी कामाला सुरवात केल्यानंतर साधारणपणे दोन आठवड्यानंतर कामाचे मोजमाप घेऊन त्याप्रमाणे दिली जाते.
- समजा एका गटात दहा मजूर काम करत आहेत त्यांनी दोन आठवड्यात ५० घनमीटर खोदाईचे काम केले तर ठरलेल्या दरानुसार या कामाच्या एकूण पैशापैकी टंचाईग्रस्त परिस्थितीत ५ किलो धान्य प्रतिदिन प्रति मनुष्य दिवस व उरलेले पैसे रोख याप्रमाणे गटाच्या प्रमुखाला दिले जातात व गटाचे लोक (स्त्री-पुरुष) समानतेने ते वाटून घेतात. जर टंचाई ग्रस्त परिस्थिती नसेल तर धान्याऐवजी रोख रक्कम मिळते.

**किती काम केल्यावर किती मजूरी मिळणार हे कसे कळते ?**

रोहयोच्या कामाच्या ठिकाणी कामाचे नमुना प्रात्यक्षिक करुन दाखविलेले असते. म्हणजे एक घनमीटर काम म्हणजे किती काम हे खड्डा खोदून दाखविले जाते. त्यामुळे कामाचा व त्याप्रमाणे मजुरीचा अंदाज येतो.

मजूरांना मजूरीचे दर सुरवातीलाच सांगितले जातात. त्याबरोबरच कामाच्या ठिकाणी सर्वांना दिसेल असा दर-फलक मराठीत ठळकपणे लिहिणे आवश्यक असते. त्यामुळे मजूरीच्या दराचा गोंधळ कमी होतो. मजूरीबाबत शंका असल्यास त्या आधीच रावसाहेब (इंजिनिअर साहेब/कृषि अधिकारी) यांना किंवा तात्या (हजेरी सहाय्यक) यांना विचारावे.

**केलेल्या कामाचे मोजमाप कधी कसे होते ?**

कामाच्या सुरवातीनंतर प्रत्येक पंधरा दिवसांच्या कालखंडानंतर अंमलबजावणी अधिकाऱ्यांतर्फे कामाचे मोजमाप होते. प्रत्येक गटाने १५ दिवसात किती काम केले, कोणत्या दर्जाचे काम केले याची नोंद वहीत केली जाते. याच नोंदीप्रमाणे व उपस्थितीच्या नोंदीप्रमाणे मजूरी अदा केली जाते.

**मजूरांना कमी मजूरी का मिळते ?**

रोहयोवर काम करणाऱ्या कामगारांच्या काही तक्रारी असतात. त्यापैकी

प्रमुख तक्रार असते ती मजूरी कमी मिळते ही. प्रमोद झिंजाडे या सामाजिक कार्यकर्त्याने रोहयोचा अनेक वर्ष अभ्यास करुन मजुरी कमी किंवा जास्त का पडते त्याची कारणे दिली आहेत.

**मजूरीचा दर कमी पडण्याची कारणे**

१) कामावर उशीरा येणे किंवा लवकर जाणे.
२) रोज ७ तास काम न करणे.
३) खूप मोठा गट (गँग) ठेवणे.
४) गटात वृध्दांचे किंवा स्त्रियांचे प्रमाण खूप जास्त ठेवणे.
५) हत्यारे कमी पडणे.
६) हत्यारांना धार नसणे.
७) कामावर दारु पिऊन जाणे.
८) मापे घेताना कामावर न थांबणे.
९) मापे उशीरा/चुकीची घेतली जाणे.
१०) कामाच्या वेळी पगार वाटपास जाणे.
११) जत्रा, यात्रा यासारख्या कारणांमुळे वरचेवर कामाचा खाडा करणे.
१२) रोहयोची माहिती न करुन घेणे.

**योग्य / चांगला मजुरीचा दर मिळण्याची कारणे.**

१) कामावर वेळेवर येणे व जाणे.
२) ७ तास पूर्ण काम करणे.
३) ५ ते १२ या मजुर संख्येचा गट ठेवणे.
४) वृध्दांचे व स्त्रियांचे प्रमाण योग्य ठेवणे.
५) पुरेशी व धार केलेली हत्यारे, साधने वापरणे.
६) नशापाणी न करता कामावर जाणे.
७) मापे घेताना हजर असणे.
८) योग्य मापे घेतली जातात याबद्दल दक्ष असणे.
९) पगारवाटपास काम संपल्यावर जाणे.
१०) कामात शक्यतो खाडे/रजा न घेणे.
११) रोहयोच्या मुख्य नियमांची माहिती करुन घेणे.
१२) कामाच्या ठिकाणी पाणी, निवाऱ्याच्या सुविधांचा आग्रह धरणे.

**रोहयोच्या कामावर कोणत्या सोई सुविधा पुरविल्या जातात ?**

रोहयोवरील मजूरांना कामाच्या ठिकाणी विविध सोई सुविधा रोहयो नियमांनी दिलेल्या आहेत. यंत्रणेच्या अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी या सुविधा मजूरांना उपलब्ध करुन देणे ही त्यांची जबाबदारी आहे. या सुविधा पुढीलप्रमाणे:

**१) पिण्याच्या पाण्याची सुविधा :** मजूरांना कामाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी पुरविले जाते. पाणी आणणाऱ्या वेगळ्या स्त्री-पुरुषांची नेमणूक करुन त्यांना रोजंदारीवर मजुरी देणे प्रसंगी बैलगाडीतून पाणी आणणे रोहयोमध्ये मान्य आहे.

**२) लहान मुलांसाठी पाळणागृहे :** लहान मुले असलेल्या स्त्रियांनाही रोहयोच्या कामावर जाता यावे यासाठी कामाच्या ठिकाणी पाळणागृहाची म्हणजेच लहान मुलांना सांभाळण्याची व्यवस्था केलेली असते. त्यासाठी पाळणा, सावली असलेला निवारा व सांभाळ करणाऱ्या रोजावर नेमलेल्या बायांची सोय करणे आवश्यक असते. सामान्यपणे मध्यम व मोठ्या कामावर अशी सोय अलिकडे उपलब्ध करुन दिली जाते. यामुळे पाळणाघरातील बाईच्या हाती मूल सोपवून लेकूरवाळ्या बाया विनाघोर रोहयोचे काम करु शकतात.

**३) निवारा :** रोहयोच्या कामाच्या ठिकणी दुपारच्या सुट्टीत विश्रांतीसाठी निवाऱ्याची, सावलीची सोय केली जाते.

**४) प्रथमोपचार :** कामावर किरकोळ दुखापत झाली असता प्रथमोपचार करण्यासाठी औषधी साहित्य उपलब्ध केले जाते.

**५) जखमींना वैद्यकिय मदत व मृतांना भरपाई :** रोहयोच्या कामावर काम करताना एखाद्या मजूराचा मृत्यु झाल्यास त्या मजूराच्या वारस नातेवाईकास सानुग्रह अनुदान अथवा भरपाई म्हणून रु. ५० हजार रोख (२००२ पासून) देण्यात येतात. जर कामावरील व्यक्ती अपंग अथवा जखमी झाल्यास त्याची भरपाई/सानुग्रह अनुदान व रुग्णालयातील उपचार/उपचारखर्च देण्याची जबाबदारी अंमलबजावणी अधिकाऱ्याची असते. उपचार काळात या जखमी मजूराला निम्मी मजूरी दैनंदिन भत्ता म्हणून दिली जाते.

**६) प्रसूती काळातील / बाळंतपणातील सुविधा :** रोहयोच्या कामावरील स्त्री मजूराने प्रसूतीआधी वर्षभरात किमान ७५ दिवस काम केले असेल तर तिला प्रसुतीसाठी १५ दिवस रजा देण्यात येते. या रजा काळात तिला त्या भागात

प्रचलित असलेल्या दरानुसार मजूरी सानुग्रह अनुदान म्हणून देण्यात येते. १५० दिवसांपेक्षाही जास्त काम त्या स्त्रीने प्रसूतीआधी वर्षभरात केले असेल तर तिला जास्तीत जास्त १ महिन्यापर्यंतची पगारी रजा मिळू शकते.

**७) कुटुंबनियोजनासाठी पगारी रजा :** रोहयोच्या कामावर असणाऱ्या स्त्री मजूराने कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रीया करुन घेतली तर १४ दिवस, पुरुष मजूरास ७ दिवस आणि स्त्रीस तांबी बसविल्यास २ दिवस पगारी रजा सानुग्रह अनुदान म्हणून देण्यात येते.

**८) छावण्या व प्रवासभत्ता :** रोहयोच्या कामावर येणारा मजूर हा लांबच्या गावाहून (किमान ५ किलोमीटर पेक्षा जास्त अंतरावरून) आला असेल तर त्याला त्याच्या गावापासून ते कामाच्या ठिकाणापर्यंतचे जाण्याचे व येण्याचे (एकदाच) प्रवासभाडे प्रवासभत्ता म्हणून दिले जाते. तसेच कामाच्या ठिकाणी तात्पुरता निवारा (छावण्या) त्यांना उपलब्ध करुन दिला जातो.

**९) खडी फोडणाऱ्या मजूरांसाठी तारेचे चष्मे :** रोहयोवर खडी फोडणाऱ्या मजूरांच्या डोळ्यांना इजा होऊ नये यासाठी त्यांना तारेचे चष्मे पुरवले जातात.

## रोहयोच्या कामावर यंत्राचा वापर किती ? केव्हा ?

रोहयोचे काम हे विकासाकरीता आहेच पण त्याचा मुख्य उद्देश मजूरांना अधिकाधीक मजूरी/रोजगार निर्माण करुन देणे हा आहे. रोहयोमध्ये म्हणूनच यंत्रांचा वापर कमीत कमी केला जातो. कामाच्या एकूण खर्चापैकी कमीत कमी ५१% खर्च हा मजूरांच्या मजूरीवर खर्च होण्याचे बंधन रोहयोत आहे. यामुळे यंत्रांच्या वापरावर मर्यादा आल्या आहेत. काही रोहयोच्या कामावर मात्र यंत्रांचा वापर करणे टाळता येत नसते. उदा. रस्ते तयार करताना ट्रॅक्टर, पाण्याचा टँकर, रोड रोलर यांचा वापर करावाच लागतो. तर विहीरीच्या कामावर ट्रॉली, बोअर यांचा वापर करावा लागतो. पण जे काम मानवी श्रमाने करता येण्याजोगे आहे त्या कामाला मशीन किंवा यंत्रे लावता येत नाहीत. बुलडोझर, जेसीबी सारखी मोठी मशीन लावणे हा रोहयोतील गंभीर गैरप्रकार आहे.

काही वेळा मातीकामातही दगड लागतो, काळी माती लांबून आणण्यासाठी ट्रॅक्टर लागतो अशावेळी अंमलबजावणी अधिकारी अत्यावश्यक स्थितीत जिल्हाधिकारी यांच्या परवानगीने यंत्रांचा वापर करु शकतात.

यंत्रांप्रमाणे रोहयोच्या कामावर कंत्राटदार, ठेकेदार यांनाही नाकारलेले आहे. रोहयोच्या कामात अंमलबजावणी अधिकारी व कामगार/मजूर यांच्यात कोणताही मध्यस्थ नसतो.

### रोहयोच्या अंतर्गत नवे कार्यक्रम/पर्याय कोणते ?

रोहयो अनेक वर्ष काम करीत आहे. गावतळी, रस्ते, बंधारे अशी लाखो कामे आजपर्यंत झाली आहेत. रोहयोतून ग्रामीण गरीबांचा, अल्पभूधारक व कोरडवाहू शेतकऱ्यांचा अधिक फायदा व्हावा म्हणून नवनव्या योजना रोहयोअंतर्गत राबविल्या जात आहेत त्यापैकी प्रमुख खालीलप्रमाणे :-

### अ) फळझाडे लागवड कार्यक्रम :

रोजगाराचा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी पडीक खडकाळ जमिनीचा वापर करुन लहान शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मजुरीसह मिळावे यासाठी फळबाग लागवड/विकास कार्यक्रम २१ जून १९९० पासून राबविला जात आहे.

### लाभार्थीची निवड कशी होते ?

शेतकरी या योजनेसाठी ग्रामीण भागातील मागास जाती, अल्पभूधारक शेतकरी यांना प्राधान्याने लाभार्थी म्हणून निवडले जाते. मोठे शेतकरीही या योजनेत सामील होऊ शकतात. शेतकऱ्यांची स्वत:ची जमीन असावी, थोडीफार पाण्याची सोय असावी आणि लावलेल्या एकूण झाडांपैकी ७५% झाडे जगवण्याची क्षमता असलेला शेतकरी या योजनेचा लाभ घेऊ शकतो. कारण अशी झाडे जगवता आली नाहीत तर त्याला लाभ नाहीच पण केलेला खर्च भरुन द्यावा लागतो. या कार्यक्रमाअंतर्गत लाभ घेऊ पाहणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण जास्त असेल तर ग्रामसभेत सर्वसहमतीने लाभार्थींची निवड केली जाते.

### या कार्यक्रमात शेतकऱ्यांना कोणते लाभ मिळतात ?

**१) क्षेत्र :** कोकण, गडचिरोली, चंद्रपूर व पश्चिम घाट या विभागात कमीत कमी ०.१० हेक्टर जमिनीत फळबाग लावता येते. उरलेल्या महाराष्ट्रात ह्या लागवडीचे क्षेत्र ०.२० हेक्टर ते ४ हेक्टर पर्यंत असू शकते.

**२) फळे :** या कार्यक्रमात आंबा, काजू, नारळ, चिक्कू, बोरे, फणस, संत्रे, डाळींब, अंजीर, चिंच, सिताफळ, जांभूळ इ. विविध प्रकारची फळझाडे व काही मसाल्याची झाडे यांची लागवड करता येते.

**३) मजूरी :** आपल्याच शेतात फळबागेची लागवड करण्यासाठी आपण केलेल्या कामाची मजूरी आपल्याला रोहयोकडून मिळते.

**४) अन्य लाभ :** फळबागेसाठी तांत्रिक मार्गदर्शन, प्रशिक्षण, कलमे व रोपांचा पुरवठा, खते व औषधांचा पुरवठा, जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी यांच्याकडून लाभधारकाला मिळतो. कामाचे मोजमाप घेणे, अनुदान वाटणे ही सर्व जबाबदारी कृषि अधिकारी यांच्याकडेच दिलेली आहे.

**ब) जवाहर विहीरींचा कार्यक्रम :**

पावसाचे पाणी अडविणे, जमिनीत मुरवणे व भूगर्भात जमलेल्या पाण्याचा उपसा करुन अधिकाधिक शेतजमीन सिंचनाखाली आणणे, पाणी टंचाई कमी करणे यासाठी जवाहर विहीरींचा कार्यक्रम १ सप्टेंबर १९८८ पासून राबविला जातो. शेतीवर अवलंबून असणारा अल्पभूधारक शेतकरी, मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय यांना जवाहर विहीरींसाठी १००% अनुदान मिळू शकते.

हा कार्यक्रम जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत राबविला जातो. गटविकास अधिकारी ग्रामसेवकांकडून मागणी करणाऱ्या लाभार्थींचे अर्ज गोळा करतात. गावाप्रमाणे व गटाप्रमाणे या अर्जांची यादी पाहून पालकमंत्री रोहयोची समन्वय समिती एकत्रितपणे लाभार्थींची शिफारस करतात. त्याला मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा परिषद समन्वय समितींच्या शिफारस संमती मिळून पालकमंत्र्यांकडे लाभार्थींची अंतिम निवड करण्यास यादी पाठविली जाते.

**क) खाजगी पडीक जमिनीवर वृक्ष लागवड कार्यक्रम :**

सामाजिक वनीकरणाच्या कामांना चालना देण्यासाठी व ग्रामीण भागात इंधन, लाकूडफाट्याची गरज भागविण्यासाठी ही योजना १९९२-९३ पासून सुरु केली आहे. स्वत:ची किमान ०.२ हेक्टर ते जास्तीत जास्त ४.०० हेक्टर जमीन असणाऱ्या मागासवर्गीय/अनुसूचित जाती जमातीच्या लहान शेतकऱ्यांना लाभार्थी म्हणून प्राधान्याने निवडले जाते. त्यांना अनुदान व मजूरी ठराविक टप्प्याने ठराविक अटींवर मिळते. सामाजिक वनीकरण अधिकाऱ्यांकडून या योजनेची सखोल माहिती मिळवता येईल.

ड) अन्य योजना :

तुती लागवडीद्वारे रेशीम कोष उत्पादन योजना रोहयोखाली महाराष्ट्र राज्याच्या खादी व ग्रामोद्योग मंडळातर्फे राबविण्यात येते. फलोद्यान विकास कार्यक्रमाप्रमाणेच या योजनेचे लाभ मिळतात. याशिवाय रोपवाटीका तयार करणे यासारखे आणखीही काही कार्यक्रम रोहयोमध्ये राबविले जातात.

## रोहयोच्या कामातील नेहमीच्या मर्यादा, अडचणी कोणत्या ? त्यावेळी आपण काय करु शकतो ?

रोहयोवर काम करताना मजूरांना अडचणी येणार नाहीत. त्यांना अधिकाधिक सुरक्षा व लाभ मिळावा तसेच गावाचाही विकास व्हावा अशी तजवीज रोहयोच्या नियोजन अंमलबजावणीमध्ये केली जाते. पण तरीही प्रत्यक्षात रोहयोवर काम करताना मजूर, गांवकरी, अंमलबजावणी यंत्रणा व अधिकारी सर्वांनाच काही अडचणी, मर्यादा जाणवतात. त्यापैकी काही प्रातिनिधिक मर्यादा, अडचणी पुढीलप्रमाणे आढळतात. यावेळी आपण काय करु शकतो हेही आपल्याला पहाता येईल.

**१) अडचण :** रोहयोचे काम योग्य वेळी/नडीला मिळत नाही.

रोहयोबाबत मागास ग्रामीण भागात बहुतेकवेळा ग्रामस्थांची ही अडचण मांडली जाते. त्यांच्यामते खरीप संपल्यावर ऑक्टोबर-नोव्हेंबर नंतर शेतीची कामे संपतात. अशावेळी अल्पभूधारक, कोरडवाहू शेतकरी व भूमीहीनांना काम नसते पण यावेळी रोहयोची कामे कमी प्रमाणात निघतात त्यामुळे ती गरजूंना मिळत नाहीत. एप्रिल-मे-जून मध्ये रोहयोच्या कामांची संख्या वाढते पण बहुतेकवेळा तोपर्यंत आदिवासी/मागास भागातील मजूरांचे शहरांमध्ये स्थलांतर झालेले असते.

**आपण काय करु शकतो :-**

रोहयोची कामे ही मागणीवर आधारलेली असतात. योग्यवेळी म्हणजे नीलप्रत तयार होण्याआधी जुलै-ऑगस्ट महिन्यात मागण्या केल्या तर रोहयोचे काम लवकर मिळू शकते. गावात शेतीचे काम नाही, कामाची गरज आहे हे तहसिलदारांना समजावून दिल्यास व शेल्फवर (तयार कामे) असल्यास लवकर कामे काढता येतात.

**२) अडचण :-** रोहयोची कामे गरजेपेक्षा खूप कमी असतात ती पुरेशी नसतात.

रोहयोच्या मागणीचे प्रमाण हे कमी जास्त होणारे असते. पाऊस, पाणी, हवामान शेतीला योग्य असेल तेव्हा रोहयोची गरज कमी असते तर टंचाई, दुष्काळ प्रतिकूल हवामान यामुळे शेतीचे काम कमी असल्याने रोहयोची मागणी वाढते. म्हणूनच गावाची/तालुक्यातील बहुतेक गावांची आणेवारी ५० पेक्षा कमी असेल तर रोहयोच्या कामांचे प्रमाण वाढविता येते. तसेच डोंगराळ व मागास आदिवासी भागातही रोहयोच्या कामांचे प्रमाण अन्य क्षेत्रापेक्षा जास्त ठेवता येते. पण तरीही कामे पुरेशी नसतात.

**आपण काय करू शकतो :-**

पुढील वर्षाच्या कामांचे नियोजन (नीलप्रत) तयार करताना वरील सर्व बाबींचा विचार करुन, मागण्यांचा विचार करुन कामाचा आराखडा तयार केलेला असतो. मागास भाग, टंचाईची स्थिती व पुरेशा मागण्या केल्या असतील तर पुरेशी कामे आपल्याला मिळू शकतात. त्यासाठी दरवर्षीचा अनुभव लक्षात घेऊन गावातील सुशिक्षित तरुण, पुढारी, शिक्षक आणि कार्यकर्ते यांच्या मदतीने अर्ज करून अधिक कामे योग्य वेळी मिळवणे शक्य आहे. यामध्ये काही अडथळे आल्यास तहसीलदारांची मदत घेता येईल.

**३) अडचणी :-** गावात गावाजवळ रोहयोचे काम निघाल्यावर काही मजूरांना तात्या (हजेरी सहाय्यक) कामावर घेत नाहीत.

**आपण काय कराल ?**

गावात काम निघाल्यावर त्या गावातील, गावाजवळील मजूर नोंदणी केल्यानंतर मिळणारे ओळखपत्र घेऊन तात्यांना दाखविल्यास काम मिळू शकेल. काही वेळा कामाचे स्वरूप लहान असते त्यामुळेही सर्वांना काम मिळत नाही. अशावेळी अंमलबजावणी अधिकारी, नोंदणी अधिकारी व तहसिलदार यांच्या मदतीने दुसरी कामे काढण्यासाठी प्रयत्न करता येतात.

**४) अडचण :-** गावात / गावाजवळ रोहयोचे काम सुरु झाले आहे हे वेळेवर कळत नाही.

**आपण काय कराल ?**

गावात काम सुरु करण्याचा आदेश मिळाल्यावर यंत्रणा अधिकारी,

ग्रामपंचायत यांच्या मदतीने सभा भरवणे, बोर्ड लिहिणे, दवंडी देणे यासारखे उपाय हाती घेऊन कामाची माहिती जवळच्या खेड्या-पाड्यात पोहोचवता येईल.

**५) अडचण :-** योग्य वेळी पुरेशा मागण्या करुनही रोहयोचे काम मिळत नाही. मागणीनंतर रोहयोचे काम मंजूर करणारी यंत्रणा तालुका व जिल्हा पातळीवर असते. त्यामुळे मागणीचे पुढे काय झाले हे कळत नाही.

**आपण काय कराल ?**

रोहयोची मागणी योग्य रीतीने, योग्य वेळी केल्यानंतरही काम मिळाले नाही तर स्थानिक पुढारी कार्यकर्ते यांच्या मदतीने मागण्यांचा पाठपुरावा करणे, तहसिल कार्यालयात नोंद/तक्रार करणे किंवा कोणतीच दखल घेतली जात नाही हे जाणवल्यानंतर बेरोजगार भत्ता मिळण्यासाठी अर्ज करता येतो.

**६) अडचण :-** रोहयोची मजूरी कमी मिळते.

रोहयोची मजूरी का कमी मिळते व ती जास्त मिळविण्यासाठी काय केले पाहिजे याचा खुलासा पान नं. १५ वर आधीच केला आहे.

**७) अडचण :-** रोहयोची मजूरी उशीरा मिळते.

रोहयोची मजूरी दोन आठवड्यांच्या कामानंतर मोजणी होऊन त्याप्रमाणे १५ दिवसात मिळणे अपेक्षित आहे. तरीही ती काही वेळा महिना काही वेळा दीड दोन महिने अशा उशीराने मिळते. बहुतेकवेळा मजूरी उशीरा मिळण्याचे कारण यंत्रणांना वेळेवर निधी न मिळणे असे असते. काही वेळा अन्य तांत्रिक कारणे अंमलबजावणीतील त्रुटी हेही असू शकते.

**आपण काय कराल ?**

मजुरीच्या विलंबाबाबत तक्रार करणे, तहसिलदारांना भेटणे, यंत्रणा अधिकाऱ्यांना आग्रह धरणे यासारख्या मर्यादित गोष्टी आपल्या हातात आहेत. काम बंद पाडणे, मोर्चे किंवा निदर्शने करणे हा अगदी टोकाचा मार्ग ठरेल.

**८) अडचण :-** स्त्रियांना, वृध्दांना रोहयोवर घेण्यास टाळाटाळ करणे त्यांना मजूरी कमी देणे.

**आपण काय कराल ?**

गट किंवा गँग तयार करताना जास्तीत जास्त रोज पडावा म्हणून स्त्रिया व वृध्दांना टाळण्याचे प्रकार काही ठिकाणी घडतात तेव्हा त्यांनाही कामावर

घेण्याचा आग्रह आपण धरला पाहिजे. रोहयोच्या नियमाप्रमाणे गटप्रमुखाने मजूरी व धान्याचे गटाच्या सदस्यांमध्ये वाटप समान करणे आवश्यक आहे.

**९) अडचणी :** रोहयोंचे धान्य निकृष्ट / कमी दर्जाचे असणे / ते उशीरा मिळणे किंवा वजनात कमी भरणे.

धान्यासंबंधी सामान्यपणे वरील अडचणी काही ठिकाणी आढळतात.

**आपण काय कराल ?**

धान्याचा दर्जा सुमार असेल तर ते धान्य बदलून मिळावे यासाठी आपण आग्रह धरू शकतो. बऱ्याच वेळा ते बदलून मिळते. धान्य वजन करुन घेतल्यास व वाटल्यास ते कमी येण्याची शक्यता नसते. धान्यवाटपाची व्यवस्था चोख ठेवण्यासाठी अंमलबजावणी यंत्रणेशी पाठपुरावा करणेही आवश्यक ठरते.

**१०) अडचण :** रोहयोच्या कामावरील सुविधा न मिळणे विविध ठिकाणी सर्व सुविधा न मिळण्याची तक्रार आढळते.

**आपण काय कराल ?**

कामाचे स्वरुप पाहून आपण या सवलती मिळाल्याच पाहिजेत असा आग्रह धरु शकतो. तरीही या मुलभूत सवलती न मिळाल्यास तहसिलदार, रोहयो समिती यांच्याकडे तक्रारही करता येईल. मजूरांचे संघटित आंदोलन हा शेवटचा उपाय होऊ शकतो.

**११) अडचण :** रोहयोच्या कामावर मोठ्या / जेसीबी सारखा यंत्राचा वापर ठेकेदारांची मध्यस्थी बेकायदेशीरपणे होणे.

रोहयोच्या कामात अशी यंत्रे वापरणे गैर आहे. पण काहीवेळा ठेकेदार व अंमलबजावणी करणारे लोक आपल्या स्वार्थी हेतूने अशी यंत्रे लावतात ही वस्तुस्थिती आहे. काहीवेळा काम लवकर व्हावे, श्रम कमी पडावे, संसाधने/ मालमत्ता यांचा लवकरात लवकर वापर करता यावा म्हणून स्वत: मजूरच मोठ्या यंत्रांचे समर्थन करतात. यंत्रे आली की बेकायदेशीर ठेकेदारही येतो.

**आपण काय कराल ?**

यंत्रे ही वेगात काम करीत असली तरी ती मजूरांची मजूरी / रोजगार खाणारी असतात. म्हणून त्यांना विरोध हा झालाच पाहिजे. केवळ वेगात व चांगले काम करणे, बंधारे बांधणे हा रोहयोचा हेतू नाही. श्रमातून मालमत्ता (बंधारे, रस्ते

इ.) निर्माण करणे हाच रोहयोचा मुख्य हेतू आहे. तेव्हा अशी यंत्रे बेकायदेशीर आहेत याची खात्री झाल्यावर सर्व मजूरांनी संघटितपणे त्याला विरोध करावा, तहसिलदार यांच्याकडे तक्रार करावी अथवा आंदोलन करणे, काम बंद पाडणे इ. उपाय हाती घेता येतील.

**१२) अडचण :** रोहयोचे काम गरीबांना न मिळता गावातील प्रभावी गटांनाच मिळते.

रोहयोचे काम उक्ते असल्यामुळे राजकारणात पुढे असणारे गावातील काही गट अधिकाऱ्यांशी सलगी करीत आपल्याच गटांना काम मिळवितात व खऱ्या गरीबांना काम मिळत नाही अशी स्थिती काही खेड्यात आढळते.

**आपण काय कराल ?**

१) अशावेळी गावातील काम न मिळालेल्या गरीबांनी अंमलबजावणी अधिकाऱ्यांना भेटून आपली रोहयो ओळखपत्रे दाखवावीत. काम मागण्याचा प्रयत्न करावा.

२) काम सुरु झाल्या घटकेला कामावर सर्वांना हजर करुन गट पाडून काम उक्त अंगावर घ्यावं.

३) अधिकारी स्थानिक पुढारी, अन्य ठेकेदार यंत्रांचा वापर करीत असतील किंवा बाहेरचे मजूर आणून काम करीत असतील तर त्याला विरोध करुन काम बंद पाडले पाहिजे व तहसिलदार अथवा तालुका रोहयो समितीकडे तक्रार केली पाहिजे.

४) काम कधी सुरु होणार, कामाचे स्वरुप काय असेल याची ग्रामसभेत, ग्रामपंचायतीत चर्चा व्हावी.

**रोहयोचे यश :**

अनेक वर्षाचे अभ्यास, प्रयोग, दबाव, राजकीय डावपेच आणि तळमळ यातून विकसित झालेली रोहयो आजही दारिद्रय निवारणाची सर्वात प्रभावी योजना आहे. रोहयोच्या मर्यादा आणि त्रुटीपेक्षा रोहयोचे यश निश्चितच मोठे आहे. रोहयोतून आपण आजपर्यंत काय मिळवलं हे पाहू.

**१) दारिद्रय निवारण :** रोहयोने गेली ३० वर्षे दारिद्रय / गरिबी हटविण्याचे काम केले आहे. अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील ग्रामीण भागात दारिद्रयाचे

प्रमाण म्हणूनच कमी आहे. जागतिक बँकेनेदेखील रोहयोच्या या कामाचे कौतुक केले आहे.

**२) गावाला कायमची संसाधने / मालमत्ता मिळाली :** पाझरतलाव, गावतलाव, नाला बंडींग, मृदसंधारण व जलसंधारण, पाटबंधारे, वनीकरण, रस्ते इ. कामाद्वारे खेडोपाडी अब्जावधी रुपयांची मालमत्ता निर्माण झाली. रोहयो अंतर्गत जानेवारी २००४ अखेरपर्यंत १२,०६१ पाझरतलाव, ३७५० गावतलाव, ९९,२७६ जवाहर विहीरी तसेच ५३,०२१ रस्त्यांची कामे पूर्ण केली. याशिवाय १०,४८,६२६ हेक्टर जमिनीवर फळझाडे लागवड करण्यात आली.

**३) बेकार हाताला काम :** रोहयोखाली जानेवारी २००४ पर्यंत ४१ लाख ८७ हजार ८९१ मजुरांनी आणि त्यापैकी १९ लाख ८५ हजार ४२ महिलांनी नोंदणी केली होती. त्यापैकी बहुतेकांना काम मिळाले. मजूरी व धान्य मिळाले दारिद्रय, उपासमार त्यातून निर्माण होणारे अनारोग्य यांच्यावर मात करता आली. त्र्यंबकेश्वर तालुक्यात २००३-०४ मध्ये माझी व्याख्याने, वचनचे काम आणि शासकीय अधिकाऱ्यांच्या सहकार्याने चांगली कामे निघाली. खेडोपाडी समाधान दिसत होते. एका खेड्यातील म्हातारी म्हणाली - रोहयोमुळे यावेळी दुष्काळातही आम्ही भात खाल्ला. आजवर उन्हाळ्यात आम्ही कण्याच खात आलो.

**४) जीवन सुधारले :** रोहयोने महाराष्ट्रातील खेडूतांचे जीवन सुधारले. गरजा भागविल्या जाणे, रोजगार मिळणे, चांगली व स्त्री-पुरुषांना समान अशी मजूरी मिळणे यामूळे लोकांचे जीवन सुधारले. दारिद्रय / उपासमारी बरोबर दोन हात करता आले. चार पैसे साठवता आले. शेतीला फायदा झाला, रस्त्यामुळे शहरांशी जोडणी झाली. व्यापार वाढला. कुटुंबाच्या मिळकतीत वाढ झाली. पुण्यातील डेव्हलपमेंट ग्रुपने अभ्यास करुन हे स्पष्ट केले की रोहयोने ग्रामीण आर्थिक जीवन सुधारले.

**५) प्रतिकूल परिस्थितीत संरक्षण :** दुष्काळ, टंचाईच्या काळात रोहयो नेहमीच संरक्षण पुरविणारी ठरली आहे. १९७२ च्या दुष्काळात महाराष्ट्रातील ग्रामीण भागात बहुतेक सर्व लोक रोहयोवर होते. पुढल्या अनेक दुष्काळातही रोहयोने हात दिला. मागील वर्षी सांगली जिल्ह्यात पडलेल्या मोठ्या दुष्काळात तेथील जिल्हाधिकारी मनिषा म्हैसकर यांनी रोहयोचा वापर करुन दुष्काळ निवारण व

दुष्काळ कायमचा टाळणाऱ्या उपाययोजना केल्या. तेथे बागायतदार शेतकऱ्यांनाही रोहयोचा आधार सांगलीत घ्यावा लागला.

**६) शेतीप्रधान अर्थव्यवस्थेचा विकास :** खेड्याची अर्थव्यवस्था ही शेतीवर आधारलेली आहे. रोहयोने केलेली मृद व जलसंधारणाची कामे तसेच रस्ते हे शेतीला व कृषि व्यापाराला चालना देणारे ठरले आहेत. रोहयोखाली आपल्या शेतात शेततळे करणारा शेतकरी वर्षभरात एक पीक जास्त घेऊ शकतो. वनीकरणाने जमिनीची धूप रोखणे शक्य होते. पाण्याची पातळी जलसंधारण कामाने वाढते. ही सर्व कामे शेतीला चालना देणारी आहेत. खेड्याची अर्थव्यवस्था ताकदवान करणारी आहे.

**७) गरीबांपर्यंत पोहोचण्याची व्यवस्था :** रोहयोमुळे सरकार गरीबांपर्यंत सहजपणे पोहोचू शकले. गरीबांशी सरकारचे जोडलेपण रोहयोने निर्माण केले. प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन म्हणतात की महाराष्ट्र व बिहारमध्ये तीव्र दुष्काळाच्या काळात उपासमारी टाळण्यासाठी केंद्राने धान्य पाठविले. पण तरीही हे धान्य गरीबांपर्यंत पोहोचू न शकल्यामुळे बिहारमध्ये जास्त भूकबळी गेले. महाराष्ट्रात रोहयोने निर्माण केलेल्या व्यवस्थेमुळे गरीबांपर्यंत धान्य पोहोचू शकले व त्यामुळे उपासमार टाळता आली.

**रोहयोच्या सूप्त क्षमता / लपलेली ताकद :**

रोहयोचे निर्माणकर्ता वि. स. पागे एका व्याख्यानात म्हणाले होते की, रोहयो ही अमृत योजना आहे. अमृत ज्याप्रमाणे अनेक अंगांनी लाभदायक असते तशीच रोहयो आहे. रोहयोचे यश गरीबांच्या दृष्टीने फायदे सांगणारे परिणाम अनेक आहेत. खरं म्हणजे रोहयोची सगळी ताकद, सगळ्या क्षमता आपण अजूनही ओळखू शकलो नाही. रोहयोचा वापर करुन महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अनेक समस्या अडचणीतून बाहेर पडून विकास साधणारे प्रयत्न आजवर झाले आहेत. त्यातून रोहयोची लपलेली ताकद लक्षात येइल.

**१) रोजंदारीचा, शेतमजूरीचा दर योग्य राखणे :** रोहयो सुरु झाल्यापासून मजूरांना मजूरीचा पर्याय निर्माण झाला. शेतमजूरांना त्यामुळे त्यांच्या मालकांनी जादा मजूरी देण्याचे मान्य केले. मजूरी कमी देऊन शेतमजूरांची पिळवणूक करण्यावर रोहयोमुळे नियंत्रण निर्माण झाले.

**२) रोजगाराच्या हक्काची जाणीव निर्माण करणे :** कै. वि. स. पागेंनी १९४९ मध्येच रोजगाराच्या हक्काची कल्पना एका लेखामध्ये मांडली होती. त्या लेखात ते म्हणतात छ. शिवाजी राजांनी किल्ले का बांधले या प्रश्नाला उत्तर देताना म्हणाले होते की संरक्षणासाठी आणि लोकांना रोजगार पुरविण्यासाठी. इतिहासाचा हा दाखला देऊन पागे म्हणतात की शिवरायांनी रोजगार पुरवणे ही शासनाची जबाबदारी म्हणून स्विकारली होती आणि ती संरक्षणाच्या बरोबरची मानली होती. रोजगाराच्या हक्काची ही कल्पना श्री. पागेंनी रोहयोशी जोडली आणि महाराष्ट्र शासनाने ती स्विकारली. कामाचा, रोजगाराचा हक्क गरीबांना मिळणे आवश्यक आहे. ही रोहयोने घेतलेली भूमिका क्रांतीकारी होती. गरीबांना न्याय्य ताकद देणारी होती. भारताच्या केंद्र शासनाने अलिकडे रोजगाराचा हक्क पुरविणारा कायदा "रोजगार हमी कायदा २००४" म्हणून स्विकारला आहे. रोजगार हक्काची जाणीव घडविणे ही रोहयोची सूप्त लपलेली क्षमता आहे.

**३) वेठबिगारीतून मुक्तता करणे :** ग्रामीण दारिद्र्याचे चटके गरीबांना उध्वस्त करतातच याशिवाय गुलामही बनवितात. प्राचीन गुलामीचे नवे रुप असणारी वेठबिगारी, खोतीतून मुक्तता घडविण्याचे काम रोहयोने केले आहे. रोहयोच्या सूप्त क्षमतेचा वापर करुन भूमिसेनेने १९७० आणि १९८० या दोन दशकांत मुंबईजवळील कोकणपट्टीतील बेठबिगारी.हटविण्यासाठी यशस्वी वापर केला.

**४) सावकारी आणि खावटीतून मुक्ती करणे :** दुष्काळ आणि दारिद्र्याच्या संकटात गरीब मजूर शेतकरी कर्जाच्या विळख्यात सापडणे ही नेहमीची गोष्ट आहे. रोहयोने प्रतिकूल काळात मजुरी व धान्याचे संरक्षण देऊन सावकारी व खावटीतून लोकांना बाहेर काढले आहे.

**५) पर्यावरणाचे रक्षण करणे :** रोहयोच्या जलसंधारण, मृदसंधारण व वनीकरणाच्या कामातून भूगर्भातील व जमिनीवरील पाण्याची पातळी वाढविणे, जमिनीची धूप रोखणे, झाडे व वनसंसाधने वाढविणे यासारखी पर्यावरणाचे रक्षण करणारी कामे होत असतात. पक्के बांधकाम, रस्ते यापेक्षा अशा कामांनाच प्राधान्य दिल्याने रोहयो ही पर्यावरण राखणारी, त्याची जाण घडविणारी आहे. या रोहयोच्या क्षमतेचा वापर व्हावा.

**६) समतावादी, समाजवादी क्षमता :** ग्रामीण गरीबी हटविण्यासाठी तेथील

संपत्तीचे पुन: वाटप करणे हा समाजवादी उपाय सांगितला जातो. भारतासारख्या भांडवलशाही देशात हा उपाय अवघड आहे. या उद्देशाने जमिनदारी निर्मुलन, कायदे, कुळ कायदे, कमाल जमिनधारणा कायदा आणि भूदानाच्या चळवळी झाल्या. श्रीमंतांचा, प्रामुख्याने शहरात राहणाऱ्यांचा पैसा कर रुपाने गोळा करुन तो गरिबांच्या योजनेमध्ये गुंतवून रोहयोदेखील समाजवादी, समतावादी कार्य करीत आहे. तिचे फायदे गरजू व गरीबांनाच मिळावे हा हेतू ओळखून रोहयोची कार्यवाही व्हावी.

७) **स्थलांतराचे दुष्परिणाम टाळणे :** रोहयोचे काम मागणी करणाऱ्या मजूरांना त्यांच्या गावी / गावाजवळ दिले जाते. त्यामुळे त्यांचे शहरात होणारे स्थलांतर, तेथे उघड्यावर रहाणे उनपाऊस अंगावर झेलणे, मुलांच्या शाळा, शिक्षणाचा खेळखंडोबा घडविणे टाळता येते. महिलांना काम आणि घर दोनही गोष्टी पहाता येतात. रोहयोच्या कामाच्या वेळा, नियोजन व योग्य वेळी मागणी करण्यात होत असलेल्या आपल्या व सरकारच्या चुका यामुळे स्थलांतरावर / मजुरांच्या शहरात जाण्यावर अजूनही आपण अंकूश ठेऊ शकलेलो नाही. रोहयोची ही क्षमता पुरेशी वापरली गेली नाही.

८) **महिला व मागासलेल्यांचे सबलीकरण :** स्त्री-पुरुषांना समान कामाबद्दल समान वेतन, गावाजवळ काम, महिलांसाठी विशेष सवलती या रोहयोच्या काही गोष्टी स्त्रियांना ताकद / बळ देणाऱ्या आहेत. तर जवाहर विहीर योजना, फळबाग विकास योजना, खाजगी जमिनीवरील वृक्ष लागवड, डोंगराळ भागातील रोहयोच्या कामासाठी शिथील केलेल्या अटी व सवलती या दलित, आदिवासी व सर्वच मागासलेल्यांना बळ, आधार देणाऱ्या आहेत. रोहयोचे हे सर्व ताकद देणारे घटक स्त्री-मागासांपर्यंत आणखी प्रभावीपणे पोहोचवणे आवश्यक आहे.

९) **लोकशाही-राजकारणाचे व सहभागी विकासाचे धडे :** रोहयोची मागणी करणे, त्यानंतर नोंदणी अधिकाऱ्याला भेटून त्या नोंदविणे, या मागण्यांचा पाठपुरावा करणे, कामाचे निर्णय घेणे, लाभार्थींची नावे ग्रामसभेत सुचविणे. एकत्रित गटवार काम करुन मजूरी व धान्य वाटून घेणे या सर्व गोष्टी खेड्यातील लोकांना लोकशाहीचे, राजकारणाचे व एकत्रित / सहभागी विकासाचे धडे देणाऱ्या आहेत. रोहयोतील श्रमशक्तीद्वारे ग्रामविकास योजना हा कार्यक्रम या

दृष्टीने महत्वाचा आहे. खेड्याच्या सर्वांगीण व संतुलित विकासाचा या योजनेमध्ये विचार केला आहे. गावातील पुढारी, सुशिक्षित व जबाबदार लोकांनी याची माहिती मिळवून पुढाकार घ्यावा.

**रोहयो आणखी फायदेशीर बनण्यासाठी काय करता येईल ?**

वि. स. पागे असे म्हणत की, रोहयो गरज आहे तोपर्यंत चालू ठेवणे यात सरकारला व रोहयोच्या यंत्रणेला समाधान आहे. गरीबांसाठी आपण काही चांगले करत आहोत. त्यांना हक्क व न्याय देत आहोत, ही गोष्टदेखील पुण्यकार्याचे समाधान देणारी आहे. कालांतराने रोहयोची गरज राहिली नाही. लोक कामावर आले नाहीत, तर यात देखील हा आनंद आहे की, या गावात आपण गरीबीवर मात केली आहे.

अशी एक एक गावे जिंकत जाऊन खेड्यातील गरीबीवर मात करणे शक्य आहे. खेड्यातील गरीबांनी आपल्या कमीजास्त क्षमतांचा व श्रमाचा वापर करुन आपला विकास घडवावा. त्यांच्यात हक्क व जबाबदारीची जाणीव निर्माण व्हावी यासाठी रोहयोने वातावरण निर्माण केले आहे. रोहयोच्या अनेक क्षमता आज वापरल्या जात नाही. रोहयोचे अज्ञान, प्रशासकीय दोष, भ्रष्ट्राचार, पुढाऱ्यांचे हितसंबंध, मजूरांची काहीवेळा आढळणारी काम टाळण्याची वृत्ती, उशीरा मजूरी, उशीरा धान्य यासारख्या अनेक अडथळ्यांवर मात करुन रोहयो यशस्वी बनवायची आहे. माहिती, रोहयोचे प्रशिक्षण व संघटीत दबावाच्या आधारे रोहयोचे साधन आणखी फायदेशीर बनविणे ही सरकारची एकट्याचीच नव्हे तर अधिकारी, स्वत: गरीब व त्यांच्या भल्यासाठी झटणाऱ्या सर्व कार्यकर्ते, संस्था यांची एकत्रित जबाबदारी आहे.

**रोहयो आणखी फायदेशीर बनविण्यासाठी थोडक्यात आपल्याला खालील गोष्टी करता येतील :-**

१) रोहयो ची सविस्तर माहिती घ्या. पुस्तक व सी.डी.चा वापर करुन ही माहिती सर्व गरीबांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करा.

२) रोहयोतील हक्क, अधिकार जाणून घ्या. तसेच जबाबदाऱ्याही लक्षात घ्या. कमी श्रमात, सहजपणे लाभ मिळण्याची अपेक्षाही सोडावी लागेल. तरच हक्कांसाठी आग्रह धरण्याचा आपल्याला अधिकार मिळेल.

३) रोहयोचा लाभ घेण्यासाठी योग्य वेळी म्हणजे जानेवारी पासून ते जुलै, ऑगस्टपर्यंत पुरेशा मागण्या करा. सुशिक्षित, तरुण, कार्यकर्ते, स्थानिक पुढारी यांनी यामध्ये पुढाकार घ्यावा.

४) रोहयोच्या मागण्यांचा पाठपुरावा करा. त्यासाठी नोंदणी अधिकारी, तहसिलदार यांच्याकडे चौकशी करा.

५) कामात अडचणी आल्यास तात्या, रावसाहेब, तहसिलदार यांना भेटून त्या सोडवून घ्याव्यात.

६) मजूरीचे दरपत्रक, नवे दर, मोजमापाचे तंत्र समजावून घ्या. कामाच्या ठिकाणी बोर्डावर दरपत्रक लावण्याचा, नमुना खड्डा ठेवण्याचा आग्रह धरा. मोजमापाच्या वेळी दक्षतेने हजर रहा.

७) रोहयोच्या कामावरील विविध सवलतींचा आग्रह धरा.

८) रोहयोचे विविध अधिकारी, रोहयो समितीचे सदस्य कोण आहेत याची माहिती घ्या. आपल्या अडचणी त्यांच्याकडे मांडा.

९) आदिवासी, स्त्रिया, वृध्द, दलित जाती यांच्यासाठी रोहयोमध्ये विशेष स्थान आहे. त्यांना न डावलता रोहयोमध्ये अग्रक्रमाने त्यांना संधी द्या.

१०) पगार वाटप व धान्यवाटप काम संपल्यावर हाती घ्या. त्यावेळी सरपंच, ग्रामसेवक, पंचायत सदस्य, शिक्षक यांच्यासमोर पगार व धान्य वाटप झाल्यास तंटे, वाद होणार नाहीत.

११) जास्तीत जास्त मजूरी मिळावी म्हणून मनापासून काम करा. योग्य मजूरी न मिळाल्यास तक्रार व त्यानंतर गरज पडली तर संघर्ष करा.

१२) मोठे, गैरवाजवी / अनावश्यक यंत्रे, ठेकेदार यांना विरोध करा.

१३) रोहयोवर येणारे मजूर विविध गावचे असतात फारच थोडा काळ कामासाठी एकत्र येतात तेव्हा त्यांना संघटीत करण्यासाठी विशेष प्रयत्न करा.

१४) रोहयोतून निर्माण झालेली गावतळी, बंधारे इ. यांचा वापर करा. त्यातून आपला, गावाचा आणखी फायदा कसा होईल ते पहा. दिंडोरी तालुक्यातील

कृष्णगाव येथे रोहयोच्या बंधाऱ्याजवळ गावातील काही लोकांनी वीटभट्टी सुरु केली. त्यामुळे काहींना कायमचा रोजगार मिळाला.

१५) रोहयोतून निर्माण झालेली संसाधने सर्वांची, गावची आहेत याची जाणीव ठेऊन त्यांची काळजी घ्या. डागडूजी, दुरुस्ती करुन त्यांचा सर्वांना दिर्घकाळ वापर कसा करता येईल ते पहा.

१६) सर्वात महत्वाचे म्हणजे ग्रामसभा ताकदवान बनवा. ग्रामसभांना उपस्थित रहा. तेथे तलाठी, ग्रामसेवक यांच्याकडून विविध योजनांची माहिती घ्या. शासकीय कागदपत्रे माहितीपत्रके चांगली संग्रह करुन ठेवा, वाचा. ग्रामसभेत सर्वांच्या मर्जीचा, फायद्याचा विचार करून निर्णय घ्या. रोहयोच्या कोणत्या कामाची मागणी करायची याचाही विचार तेथेच सभेद्वारे करा.

१७) मोहन हिराबाई हिरालाल यांची गडचिरोली चंद्रपूर येथील राज्यव्यापी संघटना, उल्का महाजन यांची रायगडमधील संघटना, पालघर परिसरातील भूमीसेना आणि नाशिकमधील वचन, श्रमजीवी संघटना यासारख्या संघटनांनी रोहयोचा अभ्यास, प्रचार करुन रोहयो अधिक फायदेशीर बनविण्यासाठी संघटीत प्रयत्न केले. अशा प्रयत्नातून रोहयोतून गरीबी हटविण्याचे व विकासाचे काम प्रभावी व वेगवान बनवू या.

१८) प्रशासन, अंमलबजावणी अधिकारी यांना समजावून घ्या. त्यांचे सल्ले घ्या. प्रसंगी त्यांनाही अडचणी सांगा, दोष दाखवा, सूचना करा, आपल्या गरजांची, अपेक्षांची माहिती. घ्या.

१९) सरकारी मदतीने व स्वबळाने दारिद्र्य हटविणे हे आपले ध्येय आहे. त्यासाठी सामुहिक प्रयत्न, सहकार्य आवश्यक आहे. रोहयोचा व अन्य योजनांचा वापर करुन रोहयोची गरज भासणार नाही अशी स्थिती निर्माण करु या.

॥ झिंदाबाद ॥

दुःख दुष्काळ दुर करुया ।
रोजगार हमीवर कष्ट करुया ।।

रोजगार हमीवर कष्ट ।
म्हणजे प्रगतीचे चित्र स्पष्ट ।।

अंगी कष्ट कामाचे ।
मागेल त्याला काम ।।
रोजगार हमी योजना ।
हाती देईल दाम ।।

नाही भिती नाही दया ।
रोजगार हमी हीच किमया ।।

वचन संस्था गेली १५ वर्षांहून जास्त काळ त्र्यंबकेश्वर आणि इगतपुरी तालुक्यातील आदिवासीं बरोबर काम करत आहे. ग्रामिण भागातील गरिबीचे समूळ उच्चाटन करणे हे वचनचे ध्येय आहे आणि त्यासाठी प्राथमिक आरोग्य, प्राथमिक शिक्षण, शेती सुधार आणि कायदे विषयक सल्ला या विविध क्षेत्रात वचन काम करते. शासकीय यंत्रणेने ग्रामपातळीवर अपेक्षित असलेलंकाम करावंयासाठी वचन विविध पातळ्यांवर कार्यशील असते आणि याच कामाचा एक महत्वाचा भाग म्हणून गावातील सर्व तरूण कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षण आणि सक्षमीकरणावर वचन भर देते. त्यासाठी आरोग्य सेवक, शिक्षण सेवक, कृषी सेवक, संघटक या सारख्या कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण हा वचनच्या प्रत्येक कार्यक्रमाचा पाया आहे.

## उपक्रम :

### • प्राथमिक शिक्षण •

- शाळा बाह्य मुलांसाठी म. फुले चे वर्ग
- शिक्षण समिती सदस्य प्रशिक्षण
- शिक्षण सेवकांचे प्रशिक्षण
- ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी साखर शाळा

### • प्राथमिक आरोग्य •

- घरोघरी नवजात बाल सेवा
- आरोग्य सेवक प्रशिक्षण

### • कृषि विस्तार •

- पारंपारिक पिकांची उत्पादकता वाढविणे
- नविन पिके रूजविणे
- फळबाग, वनशेती
- कृषि सेवक प्रशिक्षण
- शेतकरी प्रशिक्षण
- कृषि सेवा केंद्र
- बाजार माहिती केंद्र

### • उत्तम शासन व्यवस्थेसाठी प्रशिक्षण •

- संघटकांचे प्रशिक्षण
- ग्रामपंचायत सदस्य प्रशिक्षण
- रोजगार हमी योजना

### • प्रकाशने

१. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे ठरवण्यासाठी सरकारच्या नियमावलीची पुस्तिका.

२. बचत गट तयार करण्याविषयीची पुस्तीका.

. राज्य सरकारने तयार केलेल्या आदिवासींसाठीच्या योजनांची माहिती.

४. सरकारी औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील प्रवेशा संबंधी माहिती.

५. पश्चिम महाराष्ट्रातील सहा जिल्ह्यांमधील २५ साखर कारखान्यांचा अभ्यास (सीडीआरडी तर्फे)

६. रोजगार हमी योजनेवर पुस्तिका

७. रोजगार हमी १२ भागांची आकाशवाणी श्रृतिका

८. 'घडामोडी' (अनियतकालिक)

**वचन**

'वसुंधरा', शिवाजीनगर, डॉ. आंबेडकर नगर जवळ नाशिक – ४२२ ००६
फोन : (०२५३) २४१२५२०.

# ऐक माझ्या मजूर दादा
(चाल–बुध्द कबीर भिमराव फुले)

---

सदा म्हादा गोविंदा तू रे, माझं जरा ऐकून घे रे
शहर ठीकाणी जायाचं नाही रे, ऐक माझ्या मजूर दादा ..धृ..
भाकरीचं पिठ घेऊन
फाट्या पोत्या मधे भरून
जगण्या साठी जातो निधून रे. ऐक माझ्या ....//१//
ठाणा मुंबई आणि दहिसर
कोणी नाशिक कोणी सातपूर
तिथं कामं असती भरपूर रे, ऐक माझ्या ....//२//
जागा नाही मुक्कामाला
जाऊन राहातो रस्त्याला
मग जातो काम शोधायाला रे, ऐक माझ्या ....//३//
ठेकेदार येतो बोलवायला
जादा पगार देईल तूला
घेऊन जातो आपल्या कामाला रे, ऐक माझ्या ....//४//
राब राबूनी कष्ट घेतो
त्याची मजुरी किती देतो
अर्धा पगार ठेऊन घेतो रे, ऐक माझ्या ....//५//
काम संपून गेल्यावर
नाही भेटत ठेकेदार
भेटल्यावर सांगतो या नंतर रे, ऐक माझ्या ....//६//
मग मारतो भरपूर चकरा
पैसा खर्चून जातो सारा
पुन्हा थकून येतो घरा रे, ऐक माझ्या ....//७//
विचार करा आपण आपला
परगांव पाहिजे कशाला
कामंआली आपल्या गावाला रे, ऐक माझ्या ....//८//
रोजगार हमीतून विकास, योजना आहे रे झकास
आता करा आपला विकास रे...ऐक माझ्या ....//९//
(सोपान खैरे, वचन)